MHNS240012642017

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | १९.०८.२०१७ |
| नोंदणी तारीख | : | १९.०८.२०१७ |
| निकाल तारीख | : | २०.०५.२०२६ |
| कालावधी | : | वर्षे महिने दिवस |
| | | ०८ ०९ ०१ |
| निशाणी | | <u>७५</u> |

**<u>सटाणा येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात</u>**

**<u>ता. बागलाण, जिल्हा– नाशिक.</u>**

(पिठासन अधिकारी – यु.पी.हिंगमिरे)

**<u>नियमीत फौजदारी खटला क्र.१८६/२०१७</u>**

गुन्हा नोंद क्र.११३/२०१७

**फिर्यादी/तक्रारदार** **महाराष्ट्र शासन**
**मार्फत पोलीस निरीक्षक,**
जायखेडा पोलीस स्टेशन,
ता.बागलाण, जि. नाशिक

**अभियोग पक्षातर्फे** सहाय्यक सरकारी अभियोक्ता
श्री. ए.बी.महाजन.

**आरोपी** १. **पंडीत दगा देवरे,** वय ७० वर्षे,
२. **नितीन पंडित देवरे,** वय ३९ वर्षे,
दोन्ही रा. निताणे, ता. सटाणा, जि. नाशिक.

**आरोपींतर्फे विधीज्ञ** श्रीमती के. के. देवरे.

**<u>भाग – ब</u>**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २१.०६.२०१७ |

| | | |
|---|---|---|
| फिर्याद दाखल दिनांक | :– | २१.०६.२०१७ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | ११.०८.२०१७ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | :– | २२.०७.२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | २७.११.२०१९ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | –– |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | २०.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | निरंक, आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## आरोपीची माहिती

<table>
<tr><th>आरोपी क्र.</th><th>आरोपीचे नांव</th><th>अटक दिनांक</th><th>जामिनावर सोडल्याचा दिनांक</th><th>गुन्ह्याचे कलम</th><th>अंतिम आदेश</th><th>शिक्षा</th><th>फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कलावधी</th></tr>
<tr><td>१.</td><td>पंडित दगा देवरे</td><td>२९.०६.२०१७</td><td>२९.०६.२०१७</td><td rowspan="2">भादवी कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे</td><td rowspan="2">निर्दोष मुक्त</td><td>निरंक</td><td>निरंक</td></tr>
<tr><td>२.</td><td>नितीन पंडित देवरे</td><td>२९.०६.२०१७</td><td>२९.०६.२०१७</td><td>निरंक</td><td>निरंक</td></tr>
</table>

## भाग – क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष –**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | रोशन उद्धव देवरे | फिर्यादी | ३१ |
| २. | उद्धव व्यंकट देवरे | साक्षीदार | ३९ |
| ३. | सुनिल माधवराव देवरे | पंच साक्षीदार | ४० |
| ४. | कुणाल उद्धव देवरे | साक्षीदार | ४३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | डॉ. किशोर शिवाजीराव डांगे | वैद्यकीय अधिकारी | ५१ |
| ६. | गोरख धनाजी गर्दे | तपासी अधिकारी | ५७ |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार –**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | ३२ | फिर्याद |

## न्यायनिर्णय

**(घोषणा तारीख– २०.०५.२०२६.)**

प्रस्तूत खटला आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ या अपराधासाठी दाखल आहे.

०२. **अभियोगपक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.**

फिर्यादी रोशन उद्धव देवरे यांनी जायखेडा पोलीस स्टेशन येथे अशा आशयाची फिर्याद दिली की, दिनांक २१.०६.२०१७ रोजी मौजे निताणे येथे सकाळी १७.३० वा.च्या सुमारास आरोपी नं.१ ने फिर्यादीचा भाऊ कुणाल उद्धव देवरे याला म्हणाला की, या रस्त्याने जायचे नाही. हा रस्ता तुमच्या बापाचा आहे का ? या रस्त्याने तुमच्या कुटुंबाला जाऊ देणार नाही अशी कुरापत काढुन शिवीगाळ करुन आरोपी नं.२ यास बोलावुन घेवुन आरोपी नं.१ ने फिर्यादीचा भाऊ कुणाल याचे डोक्यात काठी मारुन डोके फोडुन आपखुशीने दुखापत करुन फिर्यादी भांडण सोडविण्यास गेला असता आरोपी नं.१ ने त्याच्या डोक्यात काठी मारुन डोके फोडुन आपखुशीने गंभीर दुखापत केली. तसेच फिर्यादीचे आई, वडील हे आरोपीतांना विचारपुस करण्यास गेले असता आरोपींनी फिर्यादीची आई संगिता हिस ढकलुन देऊन फिर्यादीचे वडील उद्धव यांना पण काठीने मारहाण करुन शिवीगाळ केली.

**०३.** सदरची फिर्याद गुन्हा रजिस्टर नंबर ११३/२०१७ ने नोंदविली. त्यानंतर तपासी अधिकारी यांनी दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा व जप्ती पंचनामा केला, तपास टिपणे नोंदविले, जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले, आरोपींना अटक केली. गुन्ह्याचा तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** या प्रकरणात माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द (निशाणी १८) भा.द.वि. कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवला व तो आरोपींना मराठीत वाचून व समजावून सांगितला असता त्यांनी त्यांचे वरील सर्व आरोप नाकारले व सुनावणीला सामोरे जाण्याची तयारी दर्शवली.

**०५.** आरोपींचे फौ.प्र.सं.कलम ३१३ प्रमाणे निवेदन निशाणी ६० व ६१ वर नोंदविण्यात आले. आरोपींनी बचाव घेतला की, फिर्यादीने खोटी केस केली आहे.

**०६.** अभिलेख, पुरावे पाहता, सदर प्रकरणात निकालासाठी खालील मुद्दे निघतात, ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाने संगणमत करुन फिर्यादी व साक्षीदारांना काठीने मारहाण करुन गंभीर दुखापतीस कारणीभुत ठरला ? | **नकारार्थी.** |
| २. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाने संगणमत करुन फिर्यादी व साक्षीदारांना काठीने मारहाण करुन दुखापतीस कारणीभुत ठरला ? | **नकारार्थी.** |
| ३. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाने संगणमत करुन फिर्यादी व साक्षीदारांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन दुखापतीस कारणीभुत ठरला ? | **नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| ४. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाने संगणमत करुन शांतता भंग करण्याच्या उद्देशाने फिर्यादी व साक्षीदारांना शिवीगाळ केली व अपमानित केले ? | **नकारार्थी.** |
| ५. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, आरोपींनी संगणमत करुन फिर्यादी व साक्षीदारांना जीवे मारण्याची धमकी दिली ? | **नकारार्थी.** |
| ६. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## युक्तिवाद

**०७.** अभियोगपक्षातर्फे विधीज्ञ श्री. ए. बी. महाजन व आरोपींच्या वतीने विधीज्ञ श्रीमती के. के. देवरे यांनी युक्तिवाद केला.

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रमांक १ ते ६ करिता –

**०८.** सर्व मुद्दे हे परस्पर संलग्न असल्यामुळे त्याचे विवेचन एकत्रीत केलेले आहे. फिर्यादी रोशन उद्धव देवरे (सा.क्र.१) याच्या पुराव्यात असे आले की, सदर घटना दि.२१.०६.२०१७ रोजी सायंकाळी सुमारे ५.३० वाजता बुधा उखा देवरे, दगा चिंधा देवरे व इतर दोघांच्या सामाईक क्षेत्रात घडली. त्या वेळी फिर्यादी त्यांच्या डाळिंबाच्या बागेत काम करत होते, तर त्यांचा भाऊ कुणाल हा घरातून व्यायामासाठी गावाकडे जात होता. त्यांच्या शेताजवळ पंडीत दगा देवरे, मंजुळाबाई दत्तात्रेय देवरे, रमेश डोंगर देवरे व दिलीप दगा देवरे यांची शेते असून शेतातच त्यांचे घर आहे. घरालगत तुकाराम नामदेव कोर यांचे घर आहे. घटना रमेश डोंगर पवार यांच्या घराजवळ घडली. कुणाल जात असताना आरोपी क्र.१ ने त्याला अडवून “हा रस्ता तुमच्या बापाचा आहे का” असे म्हणत आरोपी क्र.२ ला बोलावून घेतले व काठीने त्याच्या डोक्यावर मारहाण केली. आवाज ऐकून फिर्यादी तेथे गेले असता आरोपींनी त्यांच्यावरही हल्ला केला; आरोपी क्र.१ ने काठीने डोक्यावर मारले तर आरोपी क्र.२ ने त्यांना पाठीमागून धरून ठेवले. दरम्यान कुणालने वडिलांना फोन केला. आई–वडील आल्यानंतर आरोपींनी

वडिलांनाही मारहाण केली व आईला ढकलून दिले. फिर्यादी व कुणाल यांच्या डोक्यातून रक्त येऊ लागल्याने ते घरी जाऊन जायखेडा पोलीस स्टेशनला तक्रार दिली. वैद्यकीय चिठ्ठी मिळाल्यानंतर ते नामपूर येथे उपचारासाठी गेले. पुढील उपचारासाठी त्यांना मालेगांव शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले, जिथे त्यांनी सुमारे ९ ते १० दिवस उपचार घेतले असे कथन केले आहे.

**०९.** त्याच्या उलटतपासात त्याने कबुल केले की, घटनेच्या वेळी तो शेतात राहत होता, त्याला त्यांच्या शेतजमिनीचा तसेच सामाईक रस्ता असलेल्या शेताचा गट नंबर सांगता आला नाही. तसेच आरोपी रस्ता वापरू देत नाही म्हणून तहसीलदार किंवा प्रांतकडे कोणतीही केस केलेली नव्हती, तसेच दिवाणी न्यायालयातही दावा दाखल केलेला नाही. पंडीत दगा व नितीन पंडीत यांच्याकडे घटनेवेळी दोन काठ्या होत्या, मात्र त्यापैकी एकच काठी पोलिसांना दिल्याचे तो स्वतःहून सांगतो. मारहाणीची घटना सुमारे अर्धा ते पाऊण तास चालली व घटनेनंतर ते २० ते २५ मिनिटे घरी थांबले होते. घटनास्थळी ९ ते १० गावातील मजूर उपस्थित होते, त्यापैकी रत्नाबाई पवार, रमेश पवार व दिनेश पवार यांची नावे त्याला आठवतात. त्याच्या कपड्यांवर रक्त लागले होते, तसेच जखमांबाबतची माहिती त्याने पोलिसांना दिली असून पोलिसांनी त्याची नोंद करून कागद दिला होता. त्याने नामपूर येथे प्रथमोपचार घेतल्यानंतर मालेगाव येथील सरकारी दवाखान्यातही उपचार घेतल्याचे मान्य केले व नामपूरहून दुपारी सुमारे दोन ते अडीच वाजता मालेगांवला निघाल्याचे सांगितले. आरोपी क्र.२ ने त्याला पाठीमागून धरून ठेवले होते व आरोपींनी वडिलांना मारहाण केल्याचे त्याने फिर्याद देताना सांगितले होते, मात्र तो मजकूर जबाबात का नाही हे सांगता येत नसल्याचेही त्याने मान्य केले.

**१०.** उद्धव व्यंकट देवरे (सा.क्र.०२) याच्या पुराव्यात असे आले की, फिर्यादी हा त्यांचा मुलगा आहे व ते आरोपींना ओळखतात. दि.२१.०६.२०१७ रोजी ते घरी असताना त्यांचा मुलगा त्यांच्या शेतातील वहिवाटीच्या रस्त्याने जात असताना आरोपी क्र.१ व २ यांनी त्यास आडवून मारहाण केली. त्यांना फोनवरून माहिती मिळाल्यानंतर ते घटनास्थळी गेले असता त्यांच्या दोन्ही मुलांना रोशन व कुणाल यांना मारहाणीमध्ये दुखापत झालेली दिसली. त्यानंतर त्यांनी दोन्ही मुलांना पोलीस स्टेशनला नेले. आरोपींनी आडवून मारहाण केल्यामुळे रोशन व कुणाल यांच्या डोक्यास

दुखापत झाली होती. पोलीसांनी दिलेल्या यादीप्रमाणे त्यांनी प्रथम दोघांना जायखेडा येथील शासकीय रुग्णालयात नेले, त्यानंतर नामपूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले व पुढील उपचारासाठी मालेगांव येथील रुग्णालयात दोन्ही मुलांना दाखल केले होते असे कथन केले आहे.

**११.** त्यांच्या उलटतपासात असे मान्य केले की, ज्या गटात भांडण झाले तो गट क्र.४१७ किंवा ४१८ असावा. त्यांनी कबुल केले की, भांडण संपल्यानंतर त्यांना फोन आला होता. तसेच संबंधित शेतावर त्यांच्या किंवा त्यांच्या वडिलांच्या नावाची कोणतीही नोंद नाही, हेही त्यांनी मान्य केले. त्यांनी स्वतःहून सांगितले की, दिलीप दगा यांचे घर घटनास्थळी नाही. तसेच घटनेवेळी त्यांच्या दोन्ही मुलांचे कपडे रक्ताने माखलेले होते व ते कपडे त्यांनी पोलीस स्टेशनला जमा केले होते. रोशन व कुणाल यांना घटनेनंतर १५ ते २० दिवस मालेगांव येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते व त्या काळात ते त्यांच्या देखभालीसाठी तेथे थांबले होते.

**१२.** पंच सुनिल माधवराव देवरे (सा.क्र.०३) याच्या पुराव्यात असे आले की, दि.२२.०६.२०१७ रोजी पोलीसांनी त्यांना आरोपींच्या शेतात बोलावले होते. तेथे त्यांच्या समक्ष पंचनामा करण्यात आला. सदर जागा उद्धव देवरे यांनी पोलीसांना दाखवून दिली होती. घटनास्थळी जमीन रोंदलेली दिसत होती. तेथे सुमारे चार फूट लांबीची एक वेळूची काठी आढळली. सदर काठी पोलीसांनी त्यांच्या समक्ष जप्त करून त्यावर त्यांच्या सह्या घेतल्या असे कथन केले आहे. त्याच्या उलटतपासात त्याने कबुल केले की, उद्धव हा त्यांच्या मामाच्या आईचा मुलगा आहे. घटनास्थळ गट क्र.४४३ मध्ये असून त्या गटाच्या चतुःसीमा त्याला माहित नाहीत, पंचनाम्यासाठी पोलीसांनी त्याला कोणतीही लेखी नोटीस दिली नव्हती, पंचनाम्यासाठी बोलावणाऱ्या पोलीसांचे नाव त्याला माहित नाही, तसेच घटनास्थळी तो स्वतः, भरत, उद्धव, नाना व दोन पोलीस उपस्थित होते. त्याने हेही मान्य केले की, सकाळी सुमारे ८.३० वाजता त्याला बोलावून लगेच पंचनामा सुरू करण्यात आला.

**१३.** कुणाल उद्धव देवरे (सा.क्र.०४) याच्या पुराव्यात असे आले की, दि.२१.०६.२०१७ रोजी संध्याकाळी सुमारे ०५.०० ते ०६.०० वाजण्याच्या दरम्यान तो व्यायामासाठी त्यांच्या सामाईक रस्त्याने जात असताना आरोपी पंडित देवरे व नितीन देवरे यांनी त्याला अडविले. त्यावेळी आरोपी पंडितने त्यास, “हा रस्ता तुमच्या

बापाचा आहे का?" असे म्हणाला. त्यानंतर आरोपी पंडित व नितीन यांनी त्याला धक्का दिला आणि पंडितने काठीने मारहाण केली. सदर मारहाणीचा प्रकार त्याचा भाऊ रोशन याने पाहिल्यानंतर तो भांडणाच्या ठिकाणी आला असता, आरोपींनी रोशनलाही धक्काबुक्की केली. त्यानंतर त्याने आपल्या वडिलांना फोनद्वारे कळविल्याने त्याचे वडील घटनास्थळी आले असता आरोपींनी त्यांना तसेच त्याच्या आईलाही धक्काबुक्की केली. नंतर त्याच्या वडिलांनी जखमींना नामपूर येथील सरकारी दवाखान्यात उपचारासाठी नेले व पुढील उपचारासाठी मालेगांव येथील दवाखान्यात हलविले. त्यानंतर त्याच्या भावाने आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली असे कथन केले आहे.

**१४.** त्याच्या उलटतपासात त्याने मान्य केले की, गट नं.४४३ मधील वहिवाटीवरून त्यांचा व आरोपींचा वाद चालू आहे की नाही हे त्यास सांगता येत नाही. तसेच संबंधित रस्ता कोणत्या गटात येतो आणि सामाईक बांधाच्या दोन्ही बाजूंच्या गटांचे क्रमांक काय आहेत, याचीही त्याला माहिती नाही. आरोपींविरुद्ध वहिवाटीच्या रस्त्याबाबत मामलतदार न्यायालय किंवा इतर कोणत्याही न्यायालयात कोणतीही केस दाखल केलेली नसल्याचे त्याने मान्य केले. सदर मारहाणीमध्ये त्याला व त्याचा भाऊ रोशन यांना दुखापत होऊन रक्तस्राव झाला व त्यांचे कपडे रक्ताने माखले होते, मात्र हे कपडे पोलिसांकडे जमा न करता ते त्याच्या आई–वडिलांकडे देण्यात आले होते. तो, त्याचे वडील व भाऊ रोशन हे सायंकाळी सुमारे ६.३० वाजता नामपूर पोलीस स्टेशनला गेले होते आणि पोलिसांच्या सांगण्यावरून नामपूर येथील सरकारी दवाखान्यात गेले, तथापि तेथे नेमक्या किती वाजता पोहोचले हे त्यास आठवत नाही. नामपूर येथील डॉक्टरांनी मालेगाव येथे पुढील उपचारासाठी संदर्भपत्र दिले व ते सुमारे ७.३० वाजता मालेगाव येथील सरकारी दवाखान्यात गेले, मात्र तेथील डॉक्टरांचे नाव त्यास सांगता येत नाही. तो, त्याचा भाऊ व वडील साधारण दहा दिवस दवाखान्यात उपचारार्थ दाखल होते. पोलिसांनी त्यांचा जबाब दवाखान्यात तसेच नंतर निताणे गावी येऊन एकूण दोन वेळा घेतला. साक्षीदाराने हेही मान्य केले की, घटनास्थळी सुमारे दहा ते पंधरा मजूर काम करत होते व त्यापैकी चार ते पाच जण भांडण सोडविण्यास आले होते. मात्र त्या साक्षीदारांची नावे त्यास सांगता येत नाहीत. ज्या रस्त्यासाठी भांडण झाले त्या रस्त्याच्या सातबारा उताऱ्यावर रमेश डोंगर पवार यांचे नाव आहे की नाही हे त्यास माहित नसले, तरी त्यांचे घर त्यांच्या स्वतःच्या गटात असल्याचे त्याने मान्य केले. तसेच घटनास्थळापासून त्यांचे क्षेत्र सुमारे ८० फूट अंतरावर असून डाळिंबाचे शेत

७० ते ८० फूट अंतरावर आहे. पंच सुनिल माधवराव हे त्याचे नातेवाईक असून त्यांच्या शेतात जाण्यास स्वतंत्र रस्ता नसल्याने ते सामाईक रस्ता वापरत असल्याचे व तो रस्ता वापरण्याची त्यांची मागणी असल्याचेही त्याने मान्य केले.

**१५.** वैद्यकीय अधिकारी किशोर शिवाजीराव डांगे (सा.क्र.०५) यांच्या पुराव्यात असे आले की, सन २०१७ मध्ये ते मालेगांव येथील शासकीय रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होते. दि.२२.०६.२०१७ रोजी त्यांनी रोशन उद्धव देवरे या रुग्णाची एम.एल.सी. क्र.२४८८ अन्वये वैद्यकीय तपासणी केली. रुग्णाने मारहाणीचा इतिहास सांगितला होता. तपासणीदरम्यान डोक्याच्या टेम्पोरल भागावर ३ x ३ से.मी. आकाराची चिरलेली जखम (CLW), मानेला व पाठीवर बोथट आघात आढळून आले तसेच रुग्णाला ३ ते ४ वेळा उलट्या झाल्या होत्या. सर्व दुखापती कठीण व बोथट वस्तूमुळे झालेल्या असून दुखापत क्र.१ ही गंभीर, तर इतर दुखापती साध्या स्वरूपाच्या व २४ तासांच्या आत झालेल्या असल्याचे नमूद करण्यात आले. रुग्णास सी.टी. ब्रेन करण्याचा सल्ला देण्यात आला व त्यात सेरेब्रल इडेमा आढळल्याने त्यास रुग्णालयात दाखल करण्यात आले व वैद्यकीय प्रमाणपत्र देण्यात आले. या दुखापती लाकडी काठीच्या मारहाणीमुळे होऊ शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले. त्याच दिवशी त्यांनी कुणाल उद्धव देवरे (एम.एल.सी. क्र. २४८७) याचीही तपासणी केली असून त्याच्या उजव्या टेम्पोरल भागावर २ x २ से.मी. आकाराचा बोथट आघात आढळला. ही दुखापत साधी स्वरूपाची व लाकडी काठीच्या मारहाणीमुळे होऊ शकते, असे त्यांनी नमूद केले.

**१६.** त्यांच्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, त्यांच्याकडे एम.एल.सी. रजिस्टर उपलब्ध नसल्यामुळे दोन्ही रुग्णांची वैद्यकीय तपासणी नेमक्या वेळी कधी झाली आणि रुग्णांना रुग्णालयात कोणत्या वेळी आणले गेले, हे ते सांगू शकत नाहीत. रुग्णांची तपासणी त्यांनी व डॉ. सुमय्या यांनी संयुक्तपणे केली. त्यांनी स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून विशेषता प्राप्त असल्याचे मान्य केले. तसेच वैद्यकीय मंडळाचे अध्यक्ष असून प्रत्येक रुग्णाची तपासणी करण्यास अधिकृत असल्याचे नमूद केले. रुग्णांना जायखेडा पोलीस स्टेशनकडून वैद्यकीय यादीसह संदर्भित केले होते. मात्र ती यादी त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती. त्यांनी वैद्यकीय प्रमाणपत्रांवर रुग्णांच्या ओळखखुणा नमूद असल्याचे मान्य केले. मारहाणीचा इतिहास व दुखापतींचे वय नमूद नसल्याचे, उलट्या विषारी

पदार्थाने होऊ शकतात, दुखापत क्र.२ व ३ त्यांनी स्वतः तपासल्या, रोशन देवरे यांच्यावर इतर दुखापत आढळली नाही, तसेच कठीण पृष्ठभागावर पडल्यास दुखापती होऊ शकतात, असेही त्यांनी मान्य केले.

**१७.** तपासी अधिकारी गोरख धनाजी गर्दे (सा.क्र.०६) यांच्या पुराव्यात असे आले की, सन २०१७ साली ते जायखेडा पोलीस स्टेशन येथे सहा. पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत असतांना गु.र.नं.११३/२०१७ हा गुन्हा कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४ सह कलम ३४ भा.द.वि. नुसार आरोपीविरुद्ध नोंदविण्यात आला होता व वरीष्ठांच्या आदेशाने तपासासोबत गुन्ह्याची फिर्याद त्यांच्याकडे आली होती. त्यानंतर त्यांनी फिर्यादीचे अवलोकन करून तपास सुरु केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा दोन पंचांसमक्ष पंचनामा केला. पंचनाम्यादरम्यान त्यांनी पंचांसमक्ष चार फुट लांबीची एक वेळुची काठी जप्त केली आणि ती जायखेडा पोलीस स्टेशनच्या मुद्देमाल कारकुनकडे जमा करून मुद्देमाल पावती हस्तगत केली. त्यानंतर त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले तसेच जखमींची वैद्यकीय प्रमाणपत्रे मिळवून ती दोषारोपासोबत दाखल केली. गुन्ह्याचा तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपींना अटक करून न्यायालयात हजर केले व भरपूर पुरावा आढळुन आल्याने न्यायालयात आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असे कथन केले आहे.

**१८.** त्यांच्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, सदर गुन्ह्याचा त्यांना वरिष्टांनी लेखी आदेश दिला होता, त्यांनी पंचांना पंचनाम्याकरिता स्वतंत्र लेखी नोटीस दिलेली नव्हती, त्यांनी दोन जखमींची वैद्यकीय प्रमाणपत्रे दि.२९.०६.२०१७ रोजी मालेगांव येथून हस्तगत केली होती. सदर गुन्ह्यात एकूण दोन जखमी होते. त्यांनी मान्य केले की, जखमींची वैद्यकीय प्रमाणपत्रे घेत असताना ते मालेगांव येथील सरकारी दवाखान्यात भरती नव्हते. त्यांनी साक्षीदारांचे जबाब २१.०६.२०१७, २२.०६.२०१७ आणि २९.०६.२०१७ रोजी घेतले, जे संगणकीकृत आहेत, तेव्हा त्यांनी स्वतः लॅपटॉप सोबत नेला होता, परंतु प्रिंटर नव्हता आणि प्रिंट नंतर पोलीस स्टेशनला दिले. त्यांनी संगणक चालविण्याचे ज्ञान असल्याबाबत लेखी दाखला दोषारोपपत्रासोबत दाखल केलेला नाही. त्यांनी घटनास्थळाचा ७/१२ उतार पाहिला होता आणि गट नं.४४३ चा ७/१२ उतारा त्यांना दाखविला होता. तसेच, त्यांनी घटनास्थळाच्या आजूबाजूच्या लोकांचे जबाब नोंदविले होते असे मान्य केले आहे.

१९. एकंदरीत फिर्यादी व साक्षीदारांच्या पुराव्यांचे अवलोकन केले असता, फिर्यादी रोशन देवरे, उद्धव देवरे व कुणाल देवरे हे परस्पर नातेसंबंधित साक्षीदार असून त्यांच्या साक्षीस कोणत्याही स्वतंत्र व निष्पक्ष साक्षीदाराचा ठोस पाठिंबा मिळत नाही. घटनास्थळी ९ ते १० मजूर उपस्थित असल्याचे फिर्यादी पक्षाने मान्य केले असतानाही अशा स्वतंत्र साक्षीदारांची साक्ष न्यायालयासमोर आणलेली नाही. तसेच फिर्यादी व आरोपी यांच्यात सामाईक रस्त्याच्या वापराबाबत पूर्वीपासून वाद असल्याचे पुराव्यातून दिसून येते. मात्र त्या रस्त्यावरील हक्काबाबत कोणताही दस्तऐवजी पुरावा किंवा दिवाणी कार्यवाही दाखविण्यात आलेली नाही. त्यामुळे आरोपींना पूर्ववैमनस्यातून खोटेपणाने गोविण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२०. घटनास्थळ पंचनामा व जप्तीचा पुरावा देखील पूर्णपणे विश्वासार्ह वाटत नाही. पंच सुनिल देवरे हा फिर्यादी पक्षाचा नातेवाईक असून पंचनाम्यासाठी कोणतीही स्वतंत्र लेखी नोटीस देण्यात आलेली नव्हती. घटनास्थळावरून जप्त करण्यात आलेल्या वेळूच्या काठीवर रक्ताचे डाग अथवा कोणतीही वैज्ञानिक तपासणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर काठीचा आरोपींशी थेट संबंध जोडला गेलेला नाही. याशिवाय जखमींचे रक्ताने माखलेले कपडे जप्त करण्यात आले की नाही याबाबतही साक्षीदारांमध्ये विसंगती आढळून येते. तपासी अधिकाऱ्याने स्वतंत्र साक्षीदारांचे जबाब नोंदवून न्यायालयासमोर सादर केलेले नाहीत. त्यामुळे तपासात त्रुटी राहिलेल्या दिसून येतात.

२१. वैद्यकीय पुराव्यात फिर्यादी व कुणाल यांना दुखापती झाल्याचे दिसून येते, मात्र त्या दुखापती आरोपींनीच केल्याचे सिद्ध होत नाही. वैद्यकीय अधिकाऱ्याने उलटतपासात दुखापती कठीण पृष्ठभागावर पडल्यानेही होऊ शकतात असे मान्य केले आहे. तसेच एम.एल.सी. रजिस्टर उपलब्ध नसल्यामुळे तपासणीची अचूक वेळ सांगता आलेली नाही. त्यामुळे वैद्यकीय पुरावा केवळ दुखापतींचे अस्तित्व दर्शवितो. त्यामुळे सदर प्रकरणामध्ये अभियोगपक्ष आरोपींनी फिर्यादीस लाकडी दांड्याने व लाथाबुक्यांनी मारहाण करुन गंभीर दुखापत केली, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिली ही बाब संशयापलीकडे जाऊन शाबीत करु शकले नाही. तसेच, अभियोगपक्षाने इतर कुठलाही सबळ पुरावा समोर आणलेला नाही. थोडक्यात, अभियोगपक्ष आरोपी वरील आरोप संशयापलीकडे शाबीत करण्यास अपयशी ठरलेला आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ५ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला असून मुद्दा क्र.६ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## : <u>आदेश</u> :

१. आरोपी क्र.०१ व ०२ नामे, **पंडीत दगा देवरे व नितीन पंडीत देवरे** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ खाली शिक्षापात्र असलेल्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचा जामीन मुचलका रद्द करण्यात येतो.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७–अ च्या पुर्ततेकामी बंधपत्र व जामीनदाराचे जामीनखत सदर आदेशापासुन एक महिन्याचे आत सादर करावे.

४. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक वेळुची लाकडी काठी मुल्यहीन असल्याने प्रस्तुत खटल्याचा अपील कालावधी संपल्यानंतर त्याची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

UDAY PRAKASH HINGMIRE
Digitally signed by UDAY PRAKASH HINGMIRE
Date: 2026.05.20 13:21:53 +0530

**दिनांक– २०.०५.२०२६.** **(यु.पी.हिंगमिरे)**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट नं.२,**

**सटाणा.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Pratik S. Kale. |
| Court | : | Jt. Civil Judge, J.D., & J.M.F.C. |
| Date of Order/Judgment | : | 20.05.2026. |
| Order signed by the Presiding Officer on | : | 20.05.2026. |
| Order uploaded on | : | 20.05.2026. |